पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - १७ दिनांक - ०६/०१/२०२४**

गुन्हे शाखा युनिट ४ पुणे शहर

## रोकड चोरणारा आरोपी जाळयात

फिर्यादी यांनी दि. ३०/१२/२०२३ रोजी सायंकाळी ०६/०० वा. ते दि. ३१/१२/२०२३ रोजी ११/३० वा. चे सुमारास एस के पी कॅम्पस बालेवाडी पुणे येथिल ज्ञानगसागर इन्स्टयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च या ऑफिसमधील रोख ११,५०,००/- रुपये चोरी गेले बाबत चतुःश्रृंगी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९५३/२०२३ भा.द.वि. कलम ३८० प्रमाणे तक्रार दिल्याने गुन्हा दाखल होता.

दाखल गुन्हयाचा गुन्हे शाखा युनिट ०४, समांतर तपास करत असताना तांत्रीक विश्लेषणाद्वारे दाखल गुन्हयामध्ये आरोपी निष्पन्न करुन दि.०५/०१/२०२४ रोजी आरोपीचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार सारस साळवर व वैभव रणपिसे यांना त्यांचे बातमीदारामार्फत सदर गुन्हयातील आरोपी वाल्मिक पाटील हा संगमवाडी पार्किग क्र. ३ येथे आला असून तो गावी जाण्याच्या तयारीत असले बाबत बातमी मिळाली.

सदर बातमीच्या अनुषांगाने लागलीच गुन्हे शाखा, युनिट ४, पुणे शहर कडील पथकाने संगमवाडी पार्किग क्र. ०३ येथे जावून शिताफिने **वाल्मिक संजय पाटील वय ३१ वर्षे, रा. माळीवाडा, अमलेश्वरनगर, ता. अंमळनेर, जि. जळगांव** यांस ताब्यात घेतले. त्याचे कब्जात एकुण रु. ८,४८,६५०/- एवढी रोख रक्कम मिळून आली. सदर रकमेबाबत आरोपीकडे तपास केला असता त्याने सदरची रक्कम एस के पी कॅम्पस बालेवाडी पुणे येथिल ज्ञानग सागर इन्स्टयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च या ऑफिस मधुन चोरल्याचे सांगुन गुन्हयाची कबुली दिली. दाखल गुन्हा उघडकीस आणून गुन्हयातील आरोपीस पुढील कारवाई कामी चतु:श्रृंगी पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री. रितेश कुमार, मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री.सतीश गोवेकर,पोलीस निरीक्षक श्री.सोमनाथ जाधव यांचे मार्गदर्शनाखाली,सहा.पोलीस फौजदार शितल शिंदे,पोलीस अंमलदार विठ्ठल वाव्हळ, सारस साळवी, प्रविण भालचिंम, वैभव रणपिसे, यांनी केली आहे.